राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.

'STARS' प्रकल्पांतर्गत

# संकलित मूल्यमापन २ : २०२३-२४ : सराव प्रश्नपत्रिका

## इयत्ता - पाचवी : विषय - मराठी (प्रथम भाषा)

विद्यार्थ्याचे नाव : ______________________ हजेरी क्रमांक : [ ]

शाळेचे नाव : ______________________ तुकडी : ______

केंद्र : __________ ता. __________ जि. __________ दिनांक : / /२०२४

अध्ययन निष्पत्तीनिहाय व प्रश्ननिहाय गुणनोंदणी तक्ता

| अध्ययन निष्पत्ती क्रमांक | 05.01.02 | 05.01.04 | 05.01.01 | 05.01.05 | 05.01.08 | 05.01.09 | 05.01.10 | 05.01.11 | 05.01.13 | 05.01.14 | 05.01.15 | तोंडी गुण | लेखी गुण | एकूण गुण | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १ व २ | ३ ते ११ | १ ते ११ | |
| निर्धारित गुण | ५ | ५ | ५ | ४ | ३ | ४ | ७ | २ | ५ | ५ | ५ | १० | ४० | ५० | |
| एकूण प्राप्त गुण | | | | | | | | | | | | | | | |

### तोंडी चाचणी

**प्र. १) खाली दिलेला उतारा वाच. त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.**

**(गुण ५)**

१८९६ चा पावसाळा कोरडाच गेला. नंतरच्या वर्षीही उन्हाची तल्खली वाढू लागली होती. आभाळात कोरड ढग जमायचे, निघून जायचे. प्रजेच्या डोळ्यांतील पाणीसुद्धा आटलं. कोल्हापूरच्या सुपीक मातीला भेगा पडू लागल्या. शेतकरी आभाळाकडं डोळं लावून बसला.

छत्रपती राजर्षी शाहूमहाराजांविषयी लोक बोलायला लागले, 'इतका चांगला राजा मिळाला आणि आता अस्मानी संकट आलं. काय रं बाबा, आबाळाची कुऱ्हाड पडली रं मानंवर!'

सर्वत्र दुष्काळानं थैमान घातलं. हलकल्लोळ उडाला. जनावरं उपाशी पडली. बळीराजाचं काळीज दगडाचं झालं. गावपांढरी सोडून माणसं जगायला दूर चालली. गोरगरीब करपून जायला लागले. गावंच्या गावं ओस पडायला लागली.



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

अ) शेतकरी कोठे डोळे लावून बसला? (गुण १)

आ) सर्वत्र कशाने थैमान घातले? (गुण १)

इ) गावे ओस का पडू लागली? (गुण १)

ई) 'प्रजेच्या डोळ्यांतील पाणीसुद्धा आटलं' या वाक्याचा तुला समजलेला अर्थ सांग. (गुण २)

**प्र. २) खाली दिलेल्या चित्राचे निरीक्षण कर व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग. (गुण ५)**



अ) चित्रातील दृश्य कोणत्या भागातील असावे असे तुला वाटते ते सांग. (गुण १)

आ) चित्रातील मुलगी कोठे चालली असावी ते सांग. (गुण १)

इ) चित्रात ग्रामीण भागात आढळणाऱ्या कोणत्याही दोन घटकांची नावे सांग. (गुण १)

ई) चित्र पाहून तुझ्या मनात आलेले विचार थोडक्यात सांग. (गुण २)



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

## लेखी चाचणी

**प्र. ३) खाली दिलेला संवाद वाच आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ५)**

महाराज : संगीताला उत्तेजन दिलं पाहिजे. आत्ताच्या आत्ता दवंडी पिटवा – आजपासून आमच्या राज्यात सगळ्यांनी गाण्यात बोलायचं. कुणीही साधं बोलायचं नाही. सगळं गातगातच बोललं पाहिजे.

प्रधानजी : ठीक आहे, सरकार.

महाराज : जो कुणी गाण्यात बोलणार नाही त्याला शिक्षा करा. पहिल्यांदा त्याला सुळावर चढवा. मग हत्तीच्या पायी देऊन नंतर त्याचा कडेलोट करा आणि पुन्हा असं करणार नाही हे त्याच्याकडून लिहून घ्या.

प्रधानजी : आत्ताच दवंडी द्यायची व्यवस्था करतो.

**अ)** संगीताला उत्तेजन देण्यासाठी राजाने कोणती आज्ञा केली? (गुण १)

..........................................................................................

**आ)** गाण्यात न बोलणाऱ्याला राजाने काय शिक्षा करण्यास सांगितले? (गुण १)

..........................................................................................

**इ)** शब्दाचा अर्थ लिही. दवंडी : .............................. (गुण १)

**ई)** राजाने दिलेली दवंडी योग्य की अयोग्य तुझे मत काय ते लिही. (गुण २)

..........................................................................................

..........................................................................................

**प्र. ४) खालील सूचनाफलक वाच व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ४)**

**जलपुरवठा विभाग** **शनिवार, दि. २४ फेब्रुवारी, २०२४**

**पाणीपुरवठा बंद**

**जलपुरवठा विभाग :** कात्रज, पुणे यांच्यातर्फे कळविण्यात येते की, कात्रज भागातील जलवाहिन्यांच्या दुरुस्तीचे काम उद्या दिनांक २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी करण्यात येणार आहे त्यामुळे रविवारी कात्रज उद्यान परिसरातील काही भागाचा पाणीपुरवठा बंद राहील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

**अ)** ‘पाणीपुरवठा बंद’ याबाबतची सूचना कोणत्या विभागाद्वारे करण्यात आलेली आहे? (गुण १)

..................................................................................................

**आ)** कोणत्या तारखेस पाणीपुरवठा बंद राहणार आहे? (गुण १)

..................................................................................................

**इ)** पाण्याची बचत करण्यासाठी तू कोणते दोन उपाय करशील ते लिही. (गुण २)

..................................................................................................

..................................................................................................

**प्र. ५) तुझ्या शाळेत क्रीडा महोत्सव संपन्न होणार आहे. त्याकरिता शाळेच्या भित्तिपत्रकावर दिलेल्या मुद्द्यांचा विचार करून महिती लिही. (गुण ३)**

**मुद्दे :** • महोत्सवातील विविध खेळ व इयत्तेनुसार गट • विजेत्यांसाठी पारितोषिके • प्रमुख अतिथी, महोत्सव कालावधी आणि वेळ व स्थळ

**• शालेय भित्तिपत्रक •**

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

**प्र. ६) दिलेल्या सूचनेप्रमाणे उत्तरे लिही. (गुण ४)**

**अ)** एकाच शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ लिही. (गुण २)

.............................. **अंबर** ..............................

**आ)** खालील शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिही आणि तयार होणाऱ्या जोडीसाठी एक वाक्य लिही. (गुण २)

सुंदर : ..............................................

...................................................................................

**प्र. ७) दिलेल्या सूचनेप्रमाणे उत्तरे लिही. (गुण ७)**

**अ)** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदल व वाक्य पुन्हा लिही. (गुण २)

१) समीक्षाने सारिकाला हाक मारली.

...................................................................................

२) माझ्या मैत्रिणीला लाल रंगाच्या पिशव्या खूप आवडल्या.

वाक्य : ...................................................................

**आ)** कंसातील सूचनेप्रमाणे योग्य बदल करून वाक्य पुन्हा लिही. (गुण २)

१) समीरचा जीव वरखाली व्हायला लागला.

(भूतकाळी वाक्य तयार करून लिही.)

...................................................................................

२) मोर दिसताच पल्लवी टाळ्या पिटू लागली.

('पल्लवी' ऐवजी 'राघव' शब्द घे.)

...................................................................................



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

**इ)** गटात न बसणारा शब्द ओळखून, तो शब्द गटात का बसत नाही तेही लिही. (गुण १)

१) सुंदर, फूल, टवटवीत, कोमेजलेले, हिरवेगार

गटात न बसणारा शब्द : ........................................

कारण : ...............................................................................

**ई)** पुढील उताऱ्यात कंसात दिलेल्या शब्दांचे आशयानुसार रूप बदल आणि उतारा पुन्हा लिही. (गुण २)

माणसाचं ......... (मने) जसजसं मोठं होतं तसतसं 'माझी' ही कल्पनाही विस्तारत जाते. 'हे विश्वचि माझे घर' असं म्हणण्याइतकं .........(संत) मन मोठं होतं.

...............................................................................

...............................................................................

...............................................................................

...............................................................................

...............................................................................

...............................................................................

**प्र. ८) पुढील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिही व तसेच ते विरामचिन्ह वापरून एक वाक्य लिही. (गुण २)**

१) ! विरामचिन्हाचे नाव : ....................................

वाक्य : ...............................................................................

२) - विरामचिन्हाचे नाव : ....................................

वाक्य : ...............................................................................



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

**प्र. ९) दिलेल्या सूचनेप्रमाणे उत्तरे लिही.** **(गुण ५)**

**अ)** अन्न वाया जाऊ नये म्हणून पुढील प्रसंगी योजता येईल असा प्रत्येकी एक उपाय लिही. (गुण २)

१) लग्नसमारंभ : ..................................................................

२) सहल : ..................................................................

**आ)** वसंतऋतूत निसर्गात दिसून येणारा बदल तुझ्या शब्दांत चार ते पाच वाक्यांत लिही. (गुण ३)

..................................................................

..................................................................

..................................................................

..................................................................

..................................................................

..................................................................

..................................................................

**प्र.१०) शालेय परिसराची स्वच्छता याबाबत तुला काय वाटते? ते लिही.** **(गुण ५)**

..................................................................

..................................................................

..................................................................

..................................................................

..................................................................

..................................................................

..................................................................



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

**प्र.११) खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही व गोष्टीला योग्य शीर्षक दे.** **(गुण ५)**

| |
|---|
| **मुद्दे** : दोघे मित्र... टेकडीवर फिरायला जाणे... अचानक संकट... युक्ती वापरून संकटावर मात... सुखरूप घरी येणे... मैत्री दृढ होणे. |

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

■■■



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner